अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. २७ सप्टेंबर २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : ३५९ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## भारत ऑस्ट्रेलिया व्हाईटवॉश देणार?



भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात बुधवारी तिसरा आणि शेवटचा एक दिवसीय सामना राजकोट येथे होत आहे. पहिल्या दोन सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियावर एक हाती विजय मिळवला आहे. त्यामुळे हा सामना जिंकून भारत ऑस्ट्रेलियाला व्हाईटवॉश देणार का याची उत्सुकता आहे. तर ऑस्ट्रेलिया शेवट गोड करण्याच्या तयारीत असणार आहे. शेवटच्या सामन्यासाठी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचे संघात पुनरागमन होणार आहे. दुपारी १ वाजता हा सामना सुरू होणार आहे.

# झाले गेले गंगेला मिळाले शत्रू एकमेकांचे मित्र बनले

## ▶▶ करमाळा बाजार समितीत जगताप 'किंग' ▶▶ 'मेकर' ठरले आ. रणजितसिंह मोहिते-पाटील

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**सोलापूरच्या सहकार क्षेत्राच्या प्रगतीत योगदान असणाऱ्या करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या बिनविरोध निवडीवर मंगळवारी शिक्का मोर्तब झाले. माजी आमदार जयवंतराव जगताप गटाच्या ताब्यात ही मार्केट कमिटी देण्यात आली. आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांची शिष्टाई यशस्वी ठरली. त्याला आमदार संजय शिंदे यांनी ताकत दिली. त्यातून मार्केट कमिटीतील शत्रुत्व, संपुष्टात आले. कधीचे शत्रू 'झाले गेले गंगेला मिळाले' म्हणत पुन्हा एकमेकांचे 'मित्र' बनले. मार्केट कमिटीची निवडणूक बिनविरोध होणे ही करमाळा तालुक्याच्या राजकारणातील मोठी घटना मानली जात आहे.**

कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक जाहीर झाल्यापासूनच निवडणुकीच्या लढतीकडे करमाळ्यासह सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागले होते. या बाजार समितीची निवडणूक पाटील गट, बागल गट, जगताप गट, शिंदे गट, भाजप आणि प्रहार जनशक्ती संघटनेने प्रतिष्ठेची केली होती. या निवडणुकीसाठी एकूण १५४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीची होईल, असे चित्र निर्माण झाले होते. पण अखेरच्या क्षणी आमदार रणजितसिंह मोहिते पाटलांनी बाजी पलटवत इतिहासात पहिल्यांदाच ही निवडणूक बिनविरोध करून दाखवली आणि पाच वर्षांच्या ब्रेकनंतर माजी जयवंत जगताप गटाच्या हाती बाजार समितीची सूत्रे आली.

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना माजी आमदार नामदेवराव जगताप यांनी केली. पण गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत सभापती निवडीवेळी बंडखोरी झाल्याने जगताप गटाची २९ वर्षांची सत्ता गेली होती. या वेळी पुन्हा एकदा जगताप गटाकडे बिनविरोध सत्ता देण्याची भूमिका सर्वच नेत्यांनी घेतली आहे

या सर्व घडामोडींचे सर्वाधिक श्रेय आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनाच दिले जात आहे. याशिवाय माजी आमदार जयवंतराव जगताप यांना आमदार संजय शिंदे, माजी आमदार नारायण पाटील, बागल गटाचे नेते दिग्विजय बागल, भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष अतुल खुपसे यांनी सहकार्य केले आहे.



आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी माजी आमदार जयवंतराव जगताप, माजी आमदार नारायण पाटील व बागल गटाचे नेते दिग्विजय बागल यांनी अकलूज येथे बैठक घेऊन शुक्रवारी समन्वय घडवून आणला. या बैठकीत बाजार समितीची सत्ता बिनविरोध जगताप यांना देण्याचा निर्णय घेतला. ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी घेतलेला पुढाकार खूप महत्त्वाचा ठरला आहे.

> करमाळा बाजार समितीच्या १८ संचालक पदाच्या जागांसाठी १५४ अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी व्यापारी मतदारसंघातील परेशकुमार दोशी व मनोज पितळे हे आधीच बिनविरोध झाले होते. तसेच हमाल-तोलार प्रतिनिधीसाठी वालचंद रोडगे यांचा एकच अर्ज आल्याचे तेही बिनविरोध झाले होते. १८ पैकी तीन जागा आधीच बिनविरोध झाल्याने १५ जागांसाठी निवडणूक होणार होती. पण नेत्यांच्या यशस्वी तोडग्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली.

### एकमेकांचे मित्र बनले

मागील बाजार समिती सभापती निवडीच्या वेळी पाटील गटाचे माजी सभापती शिवाजी बंडगर यांनी बंडखोरी करत बागल गटात जाऊन सभापतीपद मिळवले होते आणि त्यामुळे जगताप गटाची सत्ता गेली होती. या वेळी मोठा वाद झाला. यातून माजी आमदार जयवंतराव जगताप त्यांच्या दोन मुलांवर ३०७ चा गुन्हा दाखल झाला होता. त्यामुळे या पंचवार्षिक निवडणुकीत हे तीनही गट एकत्र येतील, अशी कोणतीही शक्यता नव्हती. अशा परिस्थितीत या तिघांना एकत्र करण्याचे काम रणजितसिंह मोहिते पाटील यांनी केले आहे. यावरून राजकारणात कोण कोणाचा कायमचा शत्रू आणि कोण कोणाचा कायमचा मित्र नसतो हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

बागल गटाला दोन व पाटील गटाला दोन ग्रामपंचायत मतदारसंघातील जागा देण्यात आल्या. त्यानुसार उर्वरित उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले आहेत. आमदार संजय शिंदे व माजी आमदार जयवंतराव जगताप हे सध्या करमाळा तालुक्याच्या राजकारणात एकत्र आहेत.

बाजार समिती जगताप गटाकडे रहावी, या भूमिकेतून आमदार संजय शिंदे यांनी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना भरलेले उमेदवार अर्ज मागे घेण्याचे आदेश दिल्यानंतर दोन दिवसांत शिंदे गटाचे सर्व उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले होते. शिंदे समर्थक सुनील सावंत यांनी सोमवारी अर्ज मागे घेतला. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मंगळवारच्या शेवटच्या दिवशी पाटील गट, बागल गट व जगताप गटाच्या कार्यकर्त्यांनी आपले उमेदवारी अर्ज पाठीमागे घेतले. मात्र, भाजपचे व प्रहार जनशक्ती संघटनेचे उमेदवारी अर्ज निघणार की राहणार अशी परिस्थिती निर्माण झाली. मात्र, शेवटच्या दहा मिनिटांत भाजप व प्रहार जनशक्ती संघटनेच्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने ही निवडणूक बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला. उमेदवारी अर्ज घेऊन मागे घेण्याच्या शेवटच्या मिनिटापर्यंत या निवडणुकीबाबत उत्सुकता कायम राहिली.

## शिक्षक सेवक पदाच्या मंजुरीसाठी मागितले साडेतीन लाख रुपये

### शिक्षकाच्या वडिलांचा आरोप

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील सुरू असलेला गोंधळ थांबतो न थांबतो तोच माध्यमिक शिक्षण विभागात टप्पा अनुदान शालार्थ आयडी तसेच इतर अनेक प्रलंबित प्रकरणावर माध्यमिक शिक्षण विभागात गोंधळ सुरू आहे. शिक्षक सेवक पदाच्या मंजुरीसाठी तब्बल साडेतीन लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप या शिक्षकाच्या वडिलांनी तपासणी दरम्यान केला .

सोमवारी शिक्षक भारती संघटनेतील शिक्षक थेट शिक्षणाधिकाऱ्यांकडे मागण्यांच्या संदर्भात आले असताना या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शिक्षण अधिकाऱ्याने जिल्हा परिषदेचे एडिशनल सीईओ कोहिनकर यांच्याकडे सुनावणी लावली.

दरम्यान सुनावणीच्या वेळी एका शिक्षकाच्या वडिलांनी शिक्षक सेवक पदाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव दिला होता त्याच



प्रस्तावाबरोबर एकाच संस्थेतील दोन शिक्षक व दोन शिक्षकेतर आणि एक शिक्षक सेवक आशा शिक्षकांचा मंजुरी प्रस्ताव संबंधित शिक्षण संस्थने माध्यमिक शिक्षण विभागाकडे दिला होता. त्यातील पाच शिक्षकांपैकी चार शिक्षकांना दिलेल्या प्रस्तावाप्रमाणे मंजुरी दिली . परंतु राठोड नावाच्या शिक्षकाला प्रस्तावात त्रुटी लावून प्रकरण थांबविण्यात आले. या प्रकरणाला मंजुरी देण्यासाठी तब्बल साडेतीन लाख रुपयांची मागणी केली असल्याचा आरोप या शिक्षकाच्या वडिलांनी तपासणी दरम्यान केला.

यावर कोहिनकर यांनी प्रकरण गंभीर असल्याचे लक्षात आल्याने याबाबत वेळ मागितला असून याचे स्पष्टीकरण लवकरच देऊ असे सांगण्यात आले.

## चारित्र्याचा संशय घेत पत्नीच्या डोक्यात दगड घालून खून

### माढा तालुक्यातील घटना

सुराज्य/कुर्डूवाडी

चारित्र्यावर संशय घेऊन रात्री झोपण्यापूर्वी झालेल्या भांडणामुळे पत्नीच्या डोक्यात दगड घालून गंभीर जखमी करत जीवे ठार मारल्याप्रकरणी आरोपी लक्ष्मण संपती काळे (वय ४५ रा.अकुलगाव, ता.माढा) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुलगा शुभम याने फिर्याद दिली आहे.

ही घटना आकुलगाव येथे दि. १७ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर दरम्यान घडली. सुवर्णा लक्ष्मण काळे रा. अकुलगाव ता.माढा असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे.लक्ष्मण हा ट्रकचालक म्हणून काम करीत असून गेल्या दीडवर्षापासून ते आपल पत्नीवर चारित्र्यावर संशय घेत तिला सतत मारहाण



करीत होता. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वा. दरम्यान लक्ष्मण कामासाठी कुर्डुवाडी येथे गेले व काम नसल्याकारणाने १० वा. परत आले. त्यावेळी मुलगा शुभम आईसोबत शेळ्या चारण्यासाठी गेला होता. सायंकाळी ६ वा. सुमारास घरी परतल्यानंतर लक्ष्मण आंणि सुवर्णा यांच्यात तू भांडणे झाली.

नेहमीप्रमाणे भांडणे आहेत म्हणून मुलगा शुभम दुर्लक्ष करुन आतल्या खोलीत जाऊन झोपला. त्याचे आई वडिल मधल्या खोलीत झोपायला गेले होते.त्यानंतर रा. १.३० वा सुमारास फिर्यादीला आईने हाक मारल्याचा आवाज आला म्हणून त्याने बाहेर येऊन पाहिले असता आई झोपल्या जागीच चटईवर रक्ताच्या थारोळ्यात पडली होती दरम्यान वडिल लक्ष्मण हे हातामध्ये दगड घेऊन घराच्या बाहेर गडबडीत जाताना त्याला दिसले. दरम्यान शुभमने शेजारी राहणाऱ्या मित्राला फोन करुन कुर्डुवाडी येथे सरकारी दवाखान्यात टमटममधून आणले.

पाठोपाठ आरोपी लक्ष्मणही दवाखान्यात आला आणि ती पाय घसरून पडल्याचे सांगितले. डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी सोलापूर येथे घेऊन जाण्यास सांगितले. सोलापुर येथे उपचार सुरु असताना २१ सप्टेंबर रोजी सुवर्णाचा मृत्यू झाला. याबाबत शुभमने दिलेल्या फिर्यादीवरुन कुर्डुवाडी पोलिसांत लक्ष्मण विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

## पावसात दुचाकी घसरल्याने चालक ठार

**सोलापूर** : पावसात दुचाकी घसरल्याने ३६ वर्षीय दुचाकी चालक गंभीर जखमी होऊन उपचारा दरम्यान मयत झाले. हा अपघात तेलगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील नदीच्या पुलावर सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडला. अल्लाउद्दीन अमीन शेख (वय ३६ रा. मनगोळी ता.दक्षिण सोलापूर) असे मयत झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे. ते काल सोमवारी सायंकाळच्या सुमारास सोलापूर ते मनगोळी येथे आपल्या घराकडे निघाले होते. तेलगाव नदीच्या पुलावर पावसात दुचाकी घसरल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना महेबूब शेख (भाऊ) यांनी बेशुद्ध अवस्थेत सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारा दरम्यान ते मंगळवारी सकाळी मयत झाले. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## मैंदर्गी येथे लेझीम आणि रॉडने मारहाण; महिलेसह दोघे जखमी

**सोलापूर** : गावातील भांडण सोडविण्यास गेले असता लेझीम, लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्यांनी झालेल्या मारहाणीत महिलेसह दोघेजण जखमी झाले. ही घटना मैंदर्गी (ता.अक्कलकोट) येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. रफिक जैनुद्दीन दफेदार (वय २६, रा.मैंदर्गी) असे पहिल्या गटातील जखमीचे नाव आहे. तो गावातील भांडण सोडविण्यास केला होता. त्यावेळी सिराज जमादार, आसिफ जमादार आणि अकिल जमादार या तिघांनी त्याला लेझीम आणि लाथा बुक्क्याने मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील शकीला अश्फाक जमादार (वय २९, रा.मैंदर्गी) या जखमी झाल्या. त्या घराजवळील भांडण सोडविण्यास गेल्या असता रफिक जैनुद्दीन जमादार आणि इतर चौघांनी मिळून त्यांना लेखंडी रॉड आणि लाथाबुक्क्याने मारहाण केली.

## अकलूज येथे खंडणीसाठी सत्तूरचा धाक दाखवून दगडफेक

सुराज्य/सोलापूर

अकलूज येथील विजय चौकात खंडणीसाठी सत्तुरचा धाक दाखवत दगडफेक केल्याची घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात अकलूजच्या पोलिसांनी तिघां विरुद्ध खंडणी, दगडफेक आणि दहशत निर्माण केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.


सुरज रामचंद्र नाळे (रा. अकलूज) हैदर कादर शेख आणि जिशान रहीम शेख (दोघे रा.पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. या संदर्भात जय ज्ञानेश्वर धोत्रे (रा.लोणार गल्ली अकलूज) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. जय धोत्रे हे रविवारी रात्री आठच्या सुमारास आपली रिक्षा घेऊन विजय चौकात येत होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या सुरज नाळे याने त्याची रिक्षा अडवली. आणि तुला हप्त्याचे पैसे द्यायचे का नाही ? असे म्हणत शिवीगाळ केली . त्यावेळी सोबत असलेल्या हैदर आणि जिशान यांनी त्यांना सत्तुरचा धाक दाखविला.

नाळे याने उद्या पैसे देतो असे सांगितल्यानंतर तिघांनी जवळच असलेल्या रमजान देसाई यांच्या जनसेवा भेळ गाडीवर चाल केली. आणि तुला धंदा करायचा असेल तर आम्हाला हप्ता दे,असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे असे म्हणत तिघांनी त्याच्या भेळगाडीच्या काचा सतुरने फोडले. तर सुरज नाळे याने चौकातील दुकाने बंद करा असे म्हणून दगडफेक केली. त्यात रोहित काळे हा दुचाकी चालक जखमी झाला.

तसेच यावेळी झालेल्या दगडफेकित सुरज फोटो स्टुडिओच्या बोर्डचे नुकसान झाले. तिघांनी मिळून विजय चौकात दहशत निर्माण केली.असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार शेख पुढील तपास करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, या न्यूजमध्ये ब्रेकिंग' काय असतं?

कल्याण
367-60-235

मुंबई
134-86-169



# मुख्यमंत्री शिंदेंचा परदेश दौरा अचानक रद्द

## तर्क-वितर्क; चर्चेला उधाण आणि टिकेची झोड

सुराज्य/मुंबई

**राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आठ दिवसीय परदेश दौरा रद्द करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्री शिंदे हे १ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर या काळात जर्मनी आणि ब्रिटनच्या दौऱ्यांवर जाणार होते. जर्मनीतील रस्त्यांशी संबंधित आधुनिक तंत्रज्ञानाची पाहणी आणि ब्रिटनमध्ये गुंतवणुकीशी संबंधित चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्याचं नियोजन करण्यात करण्यात आलं होतं. मात्र हा दौरा रद्द करण्यात आल्याचं सरकारकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. सध्या हा निर्णय घेण्यात आला असला तरी काही दिवसांनी पुन्हा मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याचं नियोजन केलं जाईल, असं प्रशासनातील सूत्रांकडून सांगण्यात आलं आहे. मात्र याची जोरदार चर्चा सुरु आहे.**

आमदार अपात्रता सुनावणीच्या पार्श्वभूमीवरच मुख्यमंत्र्यांनी आपला परदेश दौरा रद्द केल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या परदेश वारीत मंत्रिमंडळातील इतर काही सहकारी आणि प्रशासकीय अधिकारीही सहभागी होणार होते. तसंच मुख्यमंत्री शिंदे हे ब्रिटन दौऱ्यात ३ ऑक्टोबर रोजी तेथील व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट संग्रहालयात असलेली छत्रपती शिवाजी महाराज यांनी अफझल खानाच्या वधासाठी वापरलेली वाघनखे भारतात आणण्यासाठी सामंजस्य करारावर सह्या करतील, असं राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवर यांनी सांगितलं होतं. मात्र आता मुख्यमंत्र्यांचा दौरा रद्द झाल्याने महाराष्ट्र शासनाच्या वतीने सुधीर मुनगंटीवार हे सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यासाठी जातील, असे समजते.

दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे आमदार आणि नेते आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांच्या परदेश दौऱ्यावर टीका करत एका दिवसाच्या कामासाठी आठवड्याभराचा वेळ खर्च करून सर्वसामान्य करदात्यांचा पैसा उधळण्याचं काम घटनाबाह्य मुख्यमंत्री करत असल्याचा हल्लाबोल केला होता.



### ये डर अच्छा हैं : अंबादास दानवे



आदित्य ठाकरे यांनी या परदेश दौऱ्याविषयी प्रश्न उपस्थित केले होते. हा दौरा का होतो? कसा होतो? या दौऱ्याचा खर्च कोणाकडून केला जातो? तसेच, हा दौरा कशासाठी होतोय? असे अनेक प्रश्न आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केले आहेत. आदित्य ठाकरे यांनी हे प्रश्न उपस्थित केले नसते तर हा दौरा झाला असता. हिंदी चित्रपटात एक संवाद आहे. 'ये डर अच्छा हैं'. ही तशीच परिस्थिती आहे. आमदार अपात्रतेप्रकरणी सुनावणीमुळे हा दौरा पुढे ढकलला असावा, असं आपणास वाटत नाही परंतु निश्चितपणे दौरा पुढे ढकलण्यामागे काही ना काही कारण असावं, असे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले.